आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

८ सप्टेंबर २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आजपासून दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर.
- गणेशोत्सवाचा सर्वत्र उत्साह/ दीड दिवसाच्या गणपतींचं आज विसर्जन
- राज्यसरकारनं लाडकी बहीण योजनेसह गेल्या दोन वर्षात सर्वच समाजघटकांसाठी जनहिताचे निर्णय घेतले असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- मुंबईत, केंद्रीय वस्तू आणि सेवा कर अधीक्षकासह तीन जणांना लाचखोरी प्रकरणी अटक

**आणि**

- पॅरिस पॅरालिंपिक स्पर्धेचा आज समारोप / पदकतालिकेत भारत १६व्या स्थानावर

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आजपासून दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर येत आहेत. आज संध्याकाळी साडेपाच वाजता छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर त्यांचं आगमन होईल. त्यानंतर संध्याकाळी साडेसात वाजता मुंबई समाचारच्या द्विशताब्दी निमित्त तयार केलेल्या लघुपटाचं ते अनावरण करतील. १८२२ मधे मुंबईत सुरु झालेलं हे गुजराती  वर्तमानपत्र आशियातल्या सर्वात जुन्या वर्तमानपत्रांपैकी एक आहे.

गृहमंत्री शाह उद्या दिवसभर मुंबईतल्या विविध भागातल्या गणेश मंडळांना भेट देणार आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर निवासस्थानी तसंच त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा निवासस्थानी जाऊन ते गणपती दर्शन

घेतील. लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाला आणि त्यानंतर वांद्रे पश्चिमेतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाला शाह भेट देणार आहेत.

**<><><><><>**

गणेशोत्सवाचा आज दुसरा दिवस असून सर्वत्र भाविकांचा उत्साह दिसून येत आहे. मुंबई- पुण्याप्रमाणेच इतर मोठ्या शहरातल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या गणपतींचं दर्शन घेण्यासाठी भाविकांच्या रांगा लागल्या आहेत. सामान्य भाविकांप्रमाणेच क्रीडा, मनोरंजन क्षेत्रातले मान्यवर तसंच राजकीय नेते, लोकप्रतिनिधी आपापल्या परिसरातल्या गणपतींच्या पूजा आरतीला हजेरी लावत आहेत. विविध मंडळांच्या वैशिष्ट्यपूर्ण मूर्ती आणि सामाजिक संदेश देणारे देखावे बघण्यासाठी पर्यटकांची झुंबड उडत आहे. आज रविवार असल्याने दर्शनासाठीचा उत्साह दुणावल्याचं दिसत आहे. दीड दिवसाच्या गणपतींच विसर्जन आज होणार आहे. ठिकठिकाणी गणेशविर्सजनासाठी महानगरपालिका आणि इतर स्थानिक प्रशासनानं चोख व्यवस्था केली आहे. मुंबई महानगरपालिकेनं केलेल्या नियोजनाविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**व्हॉईस कास्ट- अंकिता आपटे**

**ठाणे** महानगरपालिकेनं गणेश मूर्ती विसर्जित करण्यासाठी सहा मोबाईल विसर्जन यंत्रणा उभारण्याची तयारी केली आहे. विसर्जनासाठी ट्रक सज्ज करण्यात येणार असून हे ट्रक सार्वजनिक आणि घरगुती गणेश मूर्ती स्वीकारतील. याशिवाय ९ विसर्जन घाट, १५ कृत्रिम तलाव, १० मुर्ती स्वीकृती केंद्र उभारण्यात येणार आहेत. याशिवाय ४९ टँक उभारण्यात येणार आहेत.

**नवी मुंबई** महानगरपालिकेने देखील विसर्जनाची व्यवस्था केली असून विविध विभागांमध्ये १३६ कृत्रिम तलावांची निर्मिती केली आहे. निर्माल्या गोळा

करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात आली आहे. **नांदेड** जिल्ह्यात काल ३ हजार ५२० सार्वजनिक मंडळांच्या गणपतींची प्रतिष्ठापना करण्यात आली. नांदेड जिल्ह्यात गणेशोत्सव काळात वाढतं प्रदूषण रोखण्यासाठी ध्वनीवर्धक प्रणाली अर्थात डीजेच्या वापरावर येत्या १९ सप्टेंबरपर्यंत प्रतिबंध घालण्यात आला आहे..

**अकोला** शहरातही ज्येष्ठ नागरिक संघातर्फे जिल्हाधिकारी आणि महापालिका आयुक्तांकडे डीजेवर बंदी घालण्याची मागणी करण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

श्रोते हो, पुण्यातून सुरू झालेला सार्वजनिक गणेशोत्सव आता आंतरराष्ट्रीय झाला आहे. विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीने साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेणार आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यांमध्ये, दररोज. तेव्हा ऐकायला विसरू नका, आंतरराष्ट्रीय गणेशोत्सव आकाशवाणीवर.

**<><><><><>**

आपल्या सरकारनं गेल्या दोन वर्षांत घेतलेले ६०० निर्णय सर्व समाजघटकांसाठी होते, मात्र मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे त्यापैकी अनेक निर्णय काहीसे झाकोळले गेले, असं मत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मांडलं आहे. घरचं अर्थकारण सांभाळणारी लाडकी बहीण सगळ्यात हुशार असते, असं सांगून या योजनेला विरोध करणाऱ्यांवर त्यांनी टीका केली. सरकारनं ज्येष्ठ नागरिक, शेतकरी, महिला, युवांसाठी आणलेल्या योजनांचा पुनरुच्चार करून आपल्या सरकारचे हात अधिक बळकट करण्याचं आवाहन त्यांनी उपस्थितांना केलं. देवाची आळंदी इथं झालेल्या वारकरी संतपूजन सोहळ्यात ते बोलत होते.

यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मारुती महाराज कुरेकर यांना शांतिब्रह्म पुरस्कार, तर रामराव महाराज ढोक यांना तुलसीदास पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

**<><><><><>**

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन उद्या नाशिक जिल्ह्याला भेट देणार आहेत. उद्या सकाळी ते ओझर इथं पोहोचोतील, यानंतर ते शासकीय विश्रामगृहात नाशिक जिल्ह्यातले खासदार आणि आमदारांसोबत संवाद साधणार आहेत. नाशिक जिल्ह्यातल्या विविध यंत्रणांची आढावा बैठकही ते घेणार आहेत. यासोबतच उद्या दुपारी ते राजकीय पक्षांचे नाशिकमधले पदाधिकारी, संघटना प्रतिनिधी आणि विविध क्षेत्रातील तज्ज्ञांसोबतही संवाद साधणार आहेत.

**<><><><><>**

सीबीआय अर्थात केंद्रीय अन्वेषण विभागानं मुंबईतल्या केंद्रीय वस्तू आणि सेवा कर अधीक्षक आणि त्याच्या साथीदारांसह तीन जणांना २० लाख रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडलं. मुंबईतल्या सांताक्रूझ इथल्या केंद्रीय वस्तू आणि सेवा कर कार्यालयातले अधिकारी आणि अन्य ८ जणांनी अटक टाळण्यासाठी ६० लाख रुपयांच्या लाचेची मागणी केल्याची तक्रार सीबीआयला प्राप्त झाली होती. त्यानंतर सीबीआयनं सापळा रचून कारवाई केली.

मागणी केलेल्या लाचेपैकी ३० लाख रुपये हवाल्यानं स्वीकारले असल्याची माहितीही सीबीआयनं दिली आहे. अटक केलेल्या आरोपींना न्यायालयात हजर केल्यावर, न्यायालयानं वस्तू आणि सेवाकर अधिक्षक आणि सनदी लेखापाल असलेल्या आरोपींना १० सप्टेंबर पर्यंत सीबीआय कोठडी, तर त्यांच्या साथीदाराला न्यायालयीन कोठडी दिली आहे.

**<><><><><>**

पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेचा आज समारोप होणार आहे. एकूण २९ पदकांची कमाई करुन भारतानं पदकतालिकेत सोळावं स्थान पटकावलं आहे. भारतीय खेळाडूंनी सात सुवर्ण, नऊ रौप्य आणि १३ कांस्य पदकं मिळवून स्पर्धेच्या इतिहासात भारताच्या सर्वोत्तम कामगिरीची नोंद केली. पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेत नवदीप सिंगनं काल सुवर्णपदक मिळवलं. इराणच्या खेळाडूनं प्रथम क्रमांक पटकावला होता, मात्र अयोग्य वर्तनासाठी त्याला अपात्र ठरवण्यात आल्यानं नवदीपला सुवर्णपदकाचा मान मिळाला. धावपटू सिमरन शर्मानं महिलांच्या २०० मीटर ट्रॅक स्पर्धेत कास्यपदक जिंकलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पदक विजेत्या खेळाडूचं अभिनंदन केलं आहे. मोदी यांनी काल प्रवीण कुमार आणि होकातो होतोझे सेमा या पदक विजेत्या खेळाडूशी दूरध्वनीवरून संवाद साधून त्यांची प्रशंसा केली. वयाच्या ४०व्या वर्षी आपल्या पहिल्याच पॅरालिम्पिक स्पर्धेत पुरुषांच्या गोळाफेक प्रकारात कांस्य पदक पटकावणाऱ्या होकातो होतोझे सेमा याचं त्यांनी अभिनंदन केलं. दरम्यान, पॅरिसहून परतलेल्या पॅरालिम्पिक खेळाडूंचा नवी दिल्लीत केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविय यांच्या हस्ते काल सत्कार करण्यात आला. यामध्ये अवनी लेखरा, मनीष नरवाल, प्रणव सूरमा, मोना अग्रवाल, रुबिना फ्रान्सिस आणि राकेश कुमार यांचा समावेश होता.

**<><><><><>**

आज आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन आहे. व्यक्ती, समुदाय तसंच समाजाच्या दृष्टीनं साक्षरतेच्या महत्त्वाचं स्मरण करून देण्यासाठी दरवर्षी ८ सप्टेंबरला हा दिवस साजरा केला जातो. "बहुभाषिक शिक्षणाला प्रोत्साहन आणि परस्पर

सामंजस्य तसंच शांततेसाठी साक्षरता” ही यंदाच्या साक्षरता दिनाची संकल्पना आहे.

**<><><><><>**

देशाच्या पश्चिम, पूर्व आणि दक्षिण भागात जोरदार ते मुसळधार पाऊस पडण्याचा इशारा भारतीय हवामानशास्त्र विभागानं दिला आहे. आंध्र प्रदेशाचा किनारी भाग आणि यानम इथे आज अत्यंत मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र, तेलंगणा आणि ओदिशा इथे उद्यापर्यंत मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. पुढच्या आठवड्यात आसाम, मणिपूर, त्रिपुरा, मध्य प्रदेश, छत्तीसगड, कोकण, गोवा, विदर्भ, कर्नाटकाचा किनारी भाग आणि पूर्व उत्तर प्रदेश इथं जोरदार पाऊस होण्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे.

**//<><><><><>//**